# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail : desk19@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक : १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/२०१८/१५७

दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१८

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृती संबंधीत बाबींच्या कार्यवाहीस मान्यता मिळणे बाबत...

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४ दिनांक ३१ आक्टोबर, २०१८

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत " गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " योजना जाहीर करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिताची जाहिरात देण्याची कार्यवाही सप्टेंबर/ऑक्टोबर २०१८ मध्ये करण्यात येईल तसेच अंतिम निवड यादी नोव्हेंबर २०१८ मध्ये जाहीर करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिताची जाहिरात दिनांक ०८ ऑक्टोबर २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. अर्ज online पद्धतीने करावयाचे असून अर्ज करण्याची कालमर्यादा दिनांक ३० ऑक्टोबर २०१८, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास सादर करण्याकरिताची कालमर्यादा दिनांक ०६ नोव्हेंबर २०१८, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत आहे. सदरची कालमर्यादा वाढवून आता online पद्धतीने अर्ज करण्याची कालमर्यादा दिनांक ३० ऑक्टोबर २०१८ वरुन दिनांक १० नोव्हेंबर, २०१८ अशी करण्यात येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास सादर करण्याकरिताची कालमर्यादा दिनांक ०६ नोव्हेंबर २०१८ वरुन दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

1) संचालक, उच्च शिक्षण पुणे
2) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
3) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/औरंगाबाद/अमरावती